प्रेस नोट

पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई
पोलीस उप आयुक्त परीमंडळ ०१, वाशी, नवी मुंबई

................................................................................................................

परीमंडळ ०१ वाशी मधील फिर्यादी यांना गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तांतरण केलेबाबतचा कार्यक्रम.

................................................................................................................

दिनांक ०२/०४/२०२१

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अतंर्गत परीमंडळ-०१, वाशी आयोजीत, फिर्यादी यांचा गुन्हयातील जप्त केलेला मुद्देमाल हस्तांतरीत करण्याचा कार्यक्रम दिनांक ०२/०४/२०२१ रोजी मराठी साहित्य, संस्कृती व कला मंडळ, सभागृह सेक्टर नं. ०६ वाशी येथे आयोजीत करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास नवी मुंबई पोलीस आयुक्त श्री बिपीनकुमार सिंग, पोलीस उप आयुक्त परी-०१ श्री सुरेश मेंगडे, सहा. पोलीस आयुक्त श्री भरत गाडे व श्री वस्त, परीमंडळ ०१ मधील सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस आधिकारी व अंमलदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमांत परिमंडळ १ वाशी हद्दीतील ३१ फिर्यादी मुद्देमाल स्विकारण्यासाठीउपस्थित होते.

परीमंडळ ०१ मधील एकुण १० पोलीस स्टेशन अंतर्गत, गतवर्षी कोवीड १९ या रोगाच्या प्राद्रुभाव असतांना त्याला रोखण्यासाठी जवळपास ८० टक्के पोलीस दल कार्यरत असताना देखील पोलीसांनी आपले मुख्य कर्तव्य यास बगल न देता, मा. पोलीस आयुक्त सो नवी मुंबई श्री बिपीनकुमार सिंग व मा. पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ वाशी यांचे मार्गदर्शनाखाली परिमंडळ १ मधील अधिकारी व कर्मचारी यांनी परिमंडळ १ हद्दीतील चोरी, घरफोडी, चैन स्नॅचींग, गाडी चोरी, इतर चोरी व अन्य गुन्हे उघडकीस अणून आरोपीतांकडून गुन्ह्यांतील फिर्यादी यांची गेलेली मालमत्ता जप्त करण्यास प्राधान्य देवून, एकुण ०४ कोटी रुपयाचा सोन्या चांदीचे दागिने व इतर मुद्देमाल हस्तगत करुन पोलीसांनी आपले कर्तव्य चोख बजावले. सदर जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादी यांना न्यायालयीन प्रक्रिया पुर्ण करुन परत करण्यात येत आहे. कोविड १९ चा संसर्ग वाढत चालला असल्याने, जास्तीत जास्त लोक एकत्र येणे आरोग्याचे दृष्टीने योग्य नसल्याने जप्त केलेल्या मुद्देमालापैकी फक्त ३१ फिर्यादी यांना बोलावून एकुण ३५ लाख रुपयांचा सोन्याचांदीचे दागीने असा मुद्देमाल संबंधीत फिर्यादी यांना मा. पोलीस आयुक्त सो नवी मुंबई श्री बिपीनकुमार सिंग यांचे हस्ते परत करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमामध्ये मा. पोलीस आयुक्त, श्री बिपीनकुमार सिंग व मा. पोलीस उप आयुक्त, परि १ वाशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच सदरचा कार्यक्रम हा कोवीड १९ चे अनुषंगाने प्रशासनाने जारी केलेल्या आदेशाचे पालन करुन पार पाडण्यात आला आहे.

Scanned with CamScanner